

## संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# तज्ज्ञांना हे का कळाले नाही...

एव्हाना दरवर्षी मान्सून राज्यात दाखल झालेला असतो. सात जून ही त्याची दरवर्षीची तारीख असते, मात्र यंदा पावसाळा वेळेआधीच म्हणजेच मे महिन्याच्या अखेरच्या आठवड्यातच दाखल झाला. त्याच्या वेळेआधी येण्याला पर्यावरण आणि हवामान बदलास कारण ठरवण्यात आले. वेळेआधी आलेला पाऊस बेमोसमी होता की खरंच सक्रीय मान्सूनचा होता, याविषयी गोंधळाचे वातावरण होते. वेळेआधी मे महिन्यात जोरदार बरसलेल्या मान्सूनने ऐन जूनमध्ये थोडी विश्रांती घेतली आहे. हवामान खात्याने माहिती दिल्यानुसार १२ जून नंतर मान्सून खऱ्या अर्थाने सक्रीय होणार आहे. महाराष्ट्रातील ऋतुचक्र एक ते दीड महिन्याने पुढे गेल्याचा अनुभव आणि चर्चाही जुनी झाली आहे. त्यामुळे जूनच्या पहिल्या आठवड्यात येणारा पाऊस आता एखाद महिना उशिराने दाखल होतो. त्यामुळे पाणीपुरवठा, सिंचन, शेती इतर पावसावर आधारीत सर्वच घटकांचे नियोजनही दरवर्षी उशिरानेच होते, यंदा मात्र वेळेआधी मुसळधार कोसळलेल्या पावसाने शहर आणि ग्रामीण भागातील शेती, जलसिंचनाचे नियोजनही बिघडवून टाकले आहे. महाराष्ट्रात दडी मारलेल्या पावसामुळे विशेषतः शेती, जलस्त्रोत व्यवस्थापन, वीज उत्पादन आणि सामान्य जीवनावर याचा मोठा प्रभाव पडणार आहे. पेरणीत विलंब होणार असून बहुतेक खरीप पिके भात, तूर, उडीद आदी मान्सूनच्या सुरुवातीला पेरली जातात. पावसाने दडी मारल्याने या पेरण्या लांबवल्या आहेत. पाऊस वेळेआधी दाखल झाला आणि येण्याच्या वेळेतच त्याने दडी मारली त्यामुळे जमिनीतील ओलीचे गणित बिघडले आहे. उशिराने पेरण्या केल्यास पीक वाढीला पुरेसा वेळ मिळत नाही आणि वेळेआधी पेरण्या झाल्यास जमिनीत पुरेसा ओलावा मिळत नसल्याने शेतर्कयाची दोन्हीकडून अडचण झाली आहे. यातून बी बियाणे, पेरणी, खते आणि मशागतीचे खर्च वाढणार असून उत्पादनावर त्याचा होणार आहे. बियाणे किंवा खतांचा वापर विहित वेळेतच केल्यास त्याचे पुरेसे लाभ मिळणार असतात. पावसाच्या लपाछपीमुळे पेरण्यांची गणिते बिघडली आहेत. पावसाने दडी मारल्याने धरणांमध्ये पाणी साठवण उशिरा होणार असल्याने रब्बी हंगामाला त्याचा फटका बसणार आहे. महाराष्ट्रातील अनेक जलविद्युत प्रकल्प पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहेत. मान्सून उशिराने सक्रीय झाल्यास विजेचा तुटवडा होऊ शकतो, त्याचा परिणाम मुख्यतः शेतीवर होणार असून यंदा लोडशेडींग वाढण्याची चिन्हे आहेत. महाराष्ट्रात मान्सून उशिराने सक्रीय झाल्याने हवामानावर आधारित शेती, जलसंधारण, सूक्ष्म सिंचन आणि पिकांची योग्य निवड या उपाययोजना आवश्यक आहेत. देशाच्या बहुतेक भागात मान्सूनला उशीर होण्यामागील कारणे हवामान विभागाने दिली आहेत. हवामान विभागाच्या मते, बंगालच्या उपसागरात मान्सूला पूरक अशी कोणतीही हालचाल होत नसल्यामुळे ही स्थिती निर्माण झालेली आहे. ही स्थिती आणखी काही दिवस कायम राहू शकते. त्यामुळे पेरण्यांची घाई करण्याची गरज नाही. पण हाच पेरणीचा वेळ आहे, त्यामुळे शेतकरी आपल्या नेहमीच्या कामाला लागला आहे. भारतीय हवामान विभागाच्या माहितीनुसार नैऋत्य मान्सून १२ ते १८ जून दरम्यान सक्रीय होऊ शकतो, त्यातही उशीर झाल्यास जून महिनाही पावसाविनाच जाण्याची शक्यता आहे. पण वस्तूस्थिती वेगळी आहे, सध्या र्बयापैकी पाऊस पडत आहे. आयएमडीच्या माहितीनुसार १२ आणि १३ जून रोजी बंगालच्या उपसागरात मान्सूला पोषक स्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे, मात्र त्यात पुरेशी निश्चिती नाही, मान्सूला पोषक स्थिती निर्माण होण्यासाठी आवश्यक घटक अद्याप पुरेसे नजरेत आलेले नाहीत. मान्सून पुन्हा सक्रीय झाल्यानंतर मध्य भारत, महाराष्ट्राच्या काही भागात आणि दक्षिण द्वीपकल्पीय भारतात ज्या ठिकाणी मान्सून आधीच पोहोचलेला आहे, अशा ठिकाणी विरामानंतर चांगला पाऊस होण्याची अपेक्षा हवामान विभागाने वर्तवली आहे. परंतु सद्यस्थितीत मान्सूच्या देशातील हालचाली मंदच आहेत. परिणामी महाराष्ट्रातील मराठवाडा, कोकण, विदर्भात मे महिन्यातच पोहचलेला पाऊस जूनमध्ये मात्र ओढ देण्याची शक्यता आहे. पश्चिमेकडील वारे बळकट झाल्यानंतर पश्चिम किनारपट्टीवर पावसासाठी पोषक वातावरण तयार होण्यासाठी जून महिन्याच्या मध्यापर्यंत वाट पाहावी लागणार आहे. पश्चिम-मध्य बंगालच्या उपसागरावर पूर्वेकडील चक्राकार वारे विकसित होण्यासाठी जून महिन्याच्या १० ते १५ तारखेचा कालावधी जाणार आहे. त्यानंतर आंध्र प्रदेश, तेलंगणा, कर्नाटक आणि महाराष्ट्रावर वरुणराजाची कृपा होईल. १७ ते २० जूनपर्यंत मान्सून महाराष्ट्रात स्थिरावलेला असेल. येत्या सात दिवसांत महाराष्ट्रात पावसाचा यलो अलर्ट असू शकतो तर ईशान्येकडील राज्यांमध्ये मुसळधार पावसाचा धोका आहे. या वर्षीच्या पावसाने वेधशाळेपासून ते कावळ्यापर्यंत सगळ्यांचेच अंदाज चुकवलेले आहेत. पाऊस नेमका मान्सूनचा आहे की अवकाळी हे वेधशाळेला कळेना. दुसरीकडे कावळ्याने घरटे बांधण्यासाठी पाऊस कोसळला. कारण कावळा किती उंचीवर घरटे बांधतो, त्यावरून पावसाचा अंदाज बांधला जातो. पाऊस इतका लवकर येणार होता तर आधुनिक यंत्रणा सज्ज करून बसलेल्या वेधशाळेतील तज्ज्ञांना हे का कळू शकले नाही. कारण ही मंडळी सातत्याने बदलर्णाया हवामानाचा अभ्यास करत असतात, अंदाज घेत असतात, असा प्रश्न शेतकरी विचारत आहे.

# वाट पाहीन, पण एसटीनेच जाईन...

पुढाऱ्यांच्या संगनमताने बिल्डर्स, कॉर्पोरेट्स, खासगी कंपन्या यांना एसटी महामंडळ वाचविण्याच्या नावाखाली विकण्याचे धोरण आता स्पष्ट झाले आहे. स्वतःच्या मालकीचे वर्कशॉप आणि कारागीर असणारे सक्षम महामंडळ असताना, स्वतःच्या बस गाड्या बनवू शकत असताना, पेट्रोल, डिझेल पंप चालविण्याइतके तज्ज्ञ मनुष्यबळ असताना राजकारण्यांच्या कंत्राटदारांना ड्रायव्हर-कंडक्टरसहित ठेके देण्याच्या धोरणामुळे एसटीची कार्यक्षमता हळूहळू खालावली आहे.




महाराष्ट्राची उपराजधानी नागपूरसह महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या अनेक आगारांची म्हणजेच एसटी स्टँड्सची कोट्यवधी रुपये किमतीची, महाराष्ट्र सरकारच्या म्हणजेच आपल्या मालकीची जागा बांधकाम व्यावसायिकांना देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यापूर्वीच सातारा येथील विभागीय कार्यालय स्थानिक पुढाऱ्यांच्या जवळच्या बिल्डरला मोठे शॉपिंग कॉम्प्लेक्स व सिनेमा थिएटर बांधण्यासाठी देण्यात आले आणि त्याच्या मागील बाजूस विभागीय कार्यालय हलविण्यात आले. हायवेसह नगरपालिकेतील अनेक सेवांपर्यंत सर्वच गोष्टी बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा या बीओटी तत्त्वावर स्थानिक बिल्डर, कंपन्यांना, कॉर्पोरेट्सना एसटी महामंडळाच्या मालकीची अतिशय मोक्याची जागा देण्याचा सपाटा शासनाने लावला आहे. या संदर्भात आव मात्र असा आणला जातो की, परिवहन महामंडळ धोक्यात आहे. तो तोटा भरून काढण्यासाठी नाइलाजाने शासनाला हा निर्णय करावा लागतो, असे सांगितले जाते. महाराष्ट्रात महानगरपालिकेच्या आणि नगरपालिकेच्या हद्दीत २४७ बस डेपो आहेत, तर तालुक्याच्या ठिकाणी ५७८ बस स्टॅन्ड आहेत. एकूण ८२५ मोक्याच्या जागा इमारतींसह त्या त्या ठिकाणच्या पुढाऱ्यांच्या संगमताने बिल्डर्स, कॉर्पोरेट्स, खासगी कंपन्या यांना एसटी महामंडळ वाचविण्याच्या नावाखाली विकण्याचे धोरण आता स्पष्ट झाले आहे. ही सगळी मालमत्ता कोट्यवधी रुपयांची असून, निवडून दिलेले लोकप्रतिनिधी हे देशातील या मालमत्तेचे विश्वस्त आहेत ते मालक नाहीत, याचे भान त्यांचे आणि जनतेचेही सुटले आहे. घर-संसार चालत नाही म्हणून कोणी घरच विकत नसतात.

नुकताच महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी संप पुकारला होता. २५१ पैकी ९६ बस डेपो पूर्णपणे बंद होते. ऐन गणपतीच्या काळात महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या या संपाला घाबरून तात्पुरता हा संप मिटविण्यात आला. ९२ हजार कर्मचाऱ्यांनी यापूर्वी तीन महिने संप केला. संप अयशस्वी ठरला. त्यात मोठे राजकारण झाले आणि एसटीचे खासगीकरण करण्याचा मार्ग अजूनच मोकळा झाला. या सगळ्याची आता तातडीने चर्चा करून महाराष्ट्र व्यापी आंदोलन उभारण्याची गरज निर्माण झाली आहे. कल्याणकारी शासन ही संकल्पना कधीच मोडीत काढण्यात आली आहे. आरोग्य, शिक्षण, दळणवळण आणि आता परिवहन या सार्वजनिक सेवा राज्य आणि केंद्र सरकारच्या मालकीच्या व्यवस्था पूर्णपणे खासगीकरणाकडे वाटचाल करीत आहेत.

देशाच्या संविधानाचे अनुच्छेद २६५ आणि २८२ नुसार केंद्र आणि राज्य सरकारवर वाहतूक व्यवस्थेसाठी निधी उपलब्ध करून देण्याची आणि वित्तीय सहाय्य करण्याची जबाबदारी अधोरेखित करण्यात आली आहे. भारतातच नव्हे, तर संपूर्ण जगभरामध्ये विमान, रेल आणि रस्ता, जलवाहतूक हे सार्वजनिक मालकीच्या असणे आणि सर्व नागरिकास ती उपलब्ध करणे ही जबाबदारी शासनाचीच राहिली आहे. त्यासाठी विमानतळ, रेल्वे स्टेशन्स, बस स्टॉप्स, पोर्ट, वेटिंग रूम्स, शौचालय, उपहारगृह यासारख्या इतर सुविधा उपलब्ध करणे ही जबाबदारी शासनाची आहे. तसेच प्रशिक्षित सुरक्षितपणे इच्छित ठिकाणी लोकांना पोहोचविण्यासाठी कर्मचारी वर्ग देणे, त्याच्या सर्व हक्कांची काळजी घेणे हे शासनाचेच कर्तव्य आहे.

असे असताना गेल्या वीस वर्षांत मुक्त अर्थव्यवस्थेंतर्गत जगाला आपली दारं उघडण्याच्या धोरणामुळे या देशाने सार्वजनिक सेवा, सुविधांसह संपूर्ण देश इथल्या जमीन, इमारती आणि कामगारांसह कॉर्पोरेट, बिल्डर, कंत्राटदारांना विकण्याचा सपाटा लावला आहे. मानवाधिकाराचे उल्लंघन शासनाची धोरणेच करीत आहेत. विमानतळे विकली, पोर्ट्स विकली, रेल्वे स्टेशनसह लाइन्स विकल्या. त्यासोबत त्याच्या सर्व मोक्याच्या ठिकाणच्या जमिनी, इंग्रजी, सोयी-सुविधांसह विकली. कामगारांना देशोधडीला लावले. वेगवेगळी आंदोलने करून मिळवलेले कामगारहिताचे १६ कायदे रद्द केले. लेबर कोड नावाने चार कोड आणले आहेत. ते लेबर कोड नसून कॉर्पोरेट कोड आहेत. या सगळ्या षडयंत्राचाच भाग म्हणजे आता एसटी महामंडळ संपवण्याचा खूप मोठा घाट घालण्यात आला आहे.

राज्यात दररोज ५५ लाख प्रवाशांना वाहतूक सेवा पुरविणारी एसटी आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग आजही आहे. एक जून १९४८ रोजी म्हणजेच ७७ वर्षांपूर्वी पुणे-नगर या मार्गावरून पहिली एसटी महाराष्ट्र राज्य रस्ते परिवहन महामंडळाची धावली आणि महाराष्ट्राची लाईफलाइन बनली. संपूर्ण राज्यभर जाळे असणाऱ्या व स्वस्त आणि सुरक्षित प्रवासी सेवेमुळेच ग्रामीण भागातील अनेक पिढ्या शाळा-कॉलेजचे शिक्षण पूर्ण करू शकल्या, चाकरमानी कामावर जाऊ शकले, भाजीपाला, धान्य छोटे शेतकरी बाजारात आणू शकले, आजारी माणसे उपचारासाठी जिल्ह्याच्या ठिकाणी येऊ शकली, दुर्गम भागांना जगाशी जोडणारा आजही एसटी हा महत्त्वाचा दुवा आहे. गाव तिथे रस्ता आणि रस्ता तिथे एसटी यामुळे व्यापार आणि शिक्षणाला चालना मिळाली. आज १८००० हून अधिक बस असणाऱ्या महामंडळाला त्याच्या सर्व ८२५ बस स्टॅन्ड्ससह संपविण्याचा घाट घातला जात आहे.

कोविडच्या काळात अधिक अडचणीत आलेल्या महामंडळाला तीन महिने इथल्या तथाकथित पुढाऱ्यांनी आणि कर्मचाऱ्यांच्या सुपारी नेत्यांनी संप करून आणखीन अडचणीत आणले. ९२ हजारहून अधिक कर्मचाऱ्यांचे भवितव्य धोक्यात आले. १३ हजार कोटींहून अधिक रुपये रस्त्याच्या निर्मितीवर खर्च करणारे शासन एसटी महामंडळ वाचवू शकते, परंतु एसटी महामंडळाच्या खच्चीकरणाचे धोरण जाणीवपूर्वक राबविण्यात आले. राजकीय पुढाऱ्यांच्या आणि त्यांच्या बगलबच्चांच्या मालकीच्या खासगी ट्रॅव्हल्स गाड्यांना आरटीओ आणि पोलिसांकडून अभय मिळत आहे. स्वतःच्या मालकीचे वर्कशॉप आणि कारागीर असणारे सक्षम महामंडळ असताना, स्वतःच्या बस गाड्या बनवू शकत असताना, पेट्रोल, डिझेल पंप चालविण्याइतके तज्ञ मनुष्यबळ असताना राजकारण्यांच्या कंत्राटदारांना ड्रायव्हर- कंडक्टरसह ठेके देण्याच्या धोरणामुळे एसटीची कार्यक्षमता हळूहळू खालावली आहे.

एसटीचे वर्कशॉप यापूर्वीच बंद पडलेले आहे. कर्मचाऱ्यांचे पगार सहा-सहा महिने होत नाहीत. आमची लाडकी लालपरी आजारी रुग्णासारखी रस्त्याच्या कडेला बंद पडलेली उभी असते आणि त्यातील प्रवासी बापुडवाणे दुसऱ्या एसटीची वाट बघत उभे असतात. त्यावेळेला मनात कालवाकालव होते. चीडही येते आणि दुःखही होते. त्यामुळे एसटीने प्रवास करणे लोकांना आता जिकिरीचे होऊ लागले आहे. प्रवासी खासगीकरणाचे समर्थन करू लागले आहेत. म्हणूनच तुम्ही-आम्ही प्रत्यक्ष आपली लालपरी वाचवण्यासाठी पुढे यायला हवे.

विचार करा, एसटी महामंडळाचे खासगीकरण झाले, तर अधिक कार्यक्षम सेवा मिळेल का? ती स्वस्त, सुरक्षित आणि भरवशाची असेल का? महिला, रुग्ण, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, दिव्यांग यांचा विशेष विचार ते करतील का? या सर्व सेवांवर सरकारचे नियंत्रण नसल्यामुळे ते नीट सेवा देतील का? थोडक्यात एसटीचे खासगीकरण होणे हे जनसामान्यांच्या, ग्रामीण, कष्टकरी, कामगार आणि शेतकरी यांच्या हिताची नाही. म्हणून या खासगीकरणाला आपण विरोध केला पाहिजे आणि एसटी वाचविली पाहिजे. राजकारणी राज्याचे मालक नाहीत, याचे त्यांनी भान ठेवा. लोकप्रतिनिधी या नात्याने लोकांनी त्यांना विश्वासाने निवडून दिलेले आहे.

आरोग्य, शिक्षण, दळणवळण, परिवहन म्हणून सेवा देण्यासाठी ते बांधील आहेत, या व्यवस्था विकण्याचा त्यांना कोणताही अधिकार नाही. प्रत्यक्ष महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन एसटी महामंडळ, महामंडळाच्या ८००हून अधिक बस स्टँड आणि डेपो वाचवण्यासाठी महाराष्ट्रव्यापी जनआंदोलन उभे केले पाहिजे. अन्यथा राजकारणी एसटी संपवल्याशिवाय राहणार नाहीत. वेळीच सावध होऊन आंदोलन न केल्यास पुढची पिढी आपल्याला महाराष्ट्राची लालपरी म्हणजेच महाराष्ट्राची जीवनवाहिनी संपविली म्हणून आरोपीच्या पिंजऱ्यात उभी करेल. लालपरी संपवण्याचा हा संपूर्ण अध्याय, ७७ वर्षांचा हा उज्ज्वल इतिहास नष्ट करण्याचे धोरण महाराष्ट्राच्या इतिहासात काळ्याकुट्ट अक्षराने लिहिले जाईल.

# ‘ऑपरेशन सिंदूर’ने दिलेला जबर धडा

‘आयर्न डोम’ या अत्याधुनिक प्रणालीद्वारे इस्त्रायलने केलेला बचाव... भारताने पाक दहशतवाद्यांविरुद्ध राबविलेले ‘ऑपरेशन सिंदूर’... युक्रेनने ड्रोनद्वारे रशियाच्या ३०हून अधिक लढाऊ विमानांची केलेली राखरांगोळी... युद्धाचे स्वरुप बदलले आणि हवाई संरक्षण प्रणालीला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. असे असताना भारतीय वायूदलाची सद्यस्थिती आणि भविष्य काय आहे?




मोरासमोर उभे ठाकून केल्या जाणाऱ्या पारंपरिक युद्धाचे दिवस कधीच मागे सरले आहेत. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून निर्मित झालेल्या नवनवीन आयुधांद्वारे लढाई करण्याचे दिवस आले आहेत. शत्रूला कळणारही नाही, अशा पद्धतीने त्याच्यावर अचानक हल्ले करण्याची प्रणाली विकसित झाली आहे. खासकरून ड्रोन, मानव विरहित विमान (यूएव्ही), क्षेपणास्त्र आदींच्या माध्यमातून हवाई मार्गे अचूक हल्ले करता येणे शक्य आहे. गेल्या काही दिवसांत जगभरामध्ये ज्या काही घटना घडल्या त्यावर एक नजर टाकणे आवश्यक आहे.

पहिली घटना पश्चिम आशियातली. हमास या संघटनेने चहूबाजूने इस्त्रायलवर क्षेपणास्त्रांद्वारे हल्ले चढवले; मात्र, इस्त्रायलने ‘आयर्न डोम’ या अत्याधुनिक हवाई संरक्षण प्रणालीद्वारे आपल्या देशाचे उत्तमरीत्या रक्षण करून शत्रूला धूळ चारली. सर्व क्षेपणास्त्र हवेतच नष्ट केले. दुसरी घटना दक्षिण आशियातील. गेल्या महिन्यात पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानातील दहशतवादी स्थळांना नष्ट करण्यासाठी ‘ऑपरेशन सिंदूर’ हाती घेतले. भारतीय सैन्याने दहशतवाद्यांना अद्दल तर घडविलीच पण त्यासोबत दोन महत्त्वाचे पराक्रमही केले. एकाचवेळी भारतीय शहरे आणि ठिकाणांवर लक्ष्य करणारे क्षेपणास्त्र व ड्रोन यांचा हल्ला निकामी करण्यात यश मिळविले. तसेच, पाक सैन्याला अद्दल घडविण्यासाठी त्यांच्या सैन्य तळांवर अचूक हल्ला करून त्यांचे जबर नुकसान केले.

तिसरी घटना रशिया-युक्रेन युद्धातली. तब्बल दीड वर्षांच्या अथक प्रयत्न आणि अचूक नियोजनाच्या माध्यमातून युक्रेनने रशियातील विविध सैन्य ठिकाणांवर दीडशे ड्रोनने रिमोट कंट्रोलद्वारे हल्ला चढविला. यात रशियाची ३०हून अधिक अत्याधुनिक लढाऊ विमाने, क्षेपणास्त्र वाहून नेणारी वाहने यांना नेस्तनाबूत केले. रशियाने कबुली दिल्यानंतर जगभर गहजब उडाला.

चौथी घटना अमेरिकेतली. अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ‘गोल्डन डोम’ नावाची अत्याधुनिक आणि बहुआयामी हवाई संरक्षण प्रणाली विकसित करण्याची घोषणा केली. त्यासाठी तब्बल १७५ अब्ज डॉलरहून अधिक खर्च होण्याची चिन्हे आहेत.

वरील चारही घटना पाहता आपल्याला हे स्पष्ट होते की, इथून पुढे कुठल्याही देशासाठी हवाई संरक्षण प्रणाली अनन्यसाधारण महत्त्वाची असेल. ज्या देशाकडे ती नसेल किंवा कमजोर असेल त्या देशाला पराभवाचे धनी व्हावे लागेल. यात त्याचे किती नुकसान होईल? हे सांगणे अवघड आहे. लढाऊ विमानांऐवजी ड्रोन, यूएव्ही, आंतरखंडिय क्षेपणास्त्र, रडार आणि सेन्सरला चुकविणारे क्षेपणास्त्र यांचा वापर वाढणार आहे. जगभरात हवाई संरक्षण प्रणालीकडे अतिशय गांभीर्याने पाहिले जात आहे. यात संशोधन आणि विकासाला (आर अँड डी) प्राधान्य दिले जात आहे. कृत्रिम प्रज्ञा अर्थात आर्टिफिशिअल इंटेलिजन्स (एआय) या तंत्रज्ञानाचा कसा प्रभावी वापर करता येईल याचीही चढाओढ आहे. खास म्हणजे, थेट उपग्रहाद्वारे ड्रोन, यूएव्ही आणि क्षेपणास्त्रांचे नियंत्रण करण्याची प्रणालीही विकसित होत आहे. अशा पार्श्वभूमीवर भारतीय हवाई संरक्षण प्रणालीचा विचार करणे आवश्यक आहे.

भारतीय हवाई दल प्रमुख अमर प्रीत सिंग यांनी केलेली दोन महत्त्वाची विधाने अतिशय महत्त्वाची ठरतात. भारतीय बनावटीचे चौथ्या पिढीतील लढाऊ विमान तेजस याविषयी त्यांनी ही विधाने केली. या विमानांच्या निर्मितीसाठी हिंदुस्थान एअरोनॉटिक्स लिमिटेड (एचएएल) या सरकारी नवरत्न कंपनीशी हवाई दलाचा करार झाला आहे. सर्वात चिंतानजक बाब म्हणजे गेल्या दीड दशकात एकही तेजस विमान हवाई दलाला प्राप्त झालेले नाही. पहिले विमान कधी देण्यात येईल? सर्वच्या सर्व म्हणजे ८३ विमानांची ऑर्डर किती वर्षांत पूर्ण होईल? याबाबत संदिग्धता आहे. तब्बल ४८ हजार कोटी रुपयांचा हा सौदा आहे. लढाऊ विमानांचे इंजिन विकसित करण्यात भारतीय संरक्षण उद्योगाला अद्याप यश आलेले नाही. त्यामुळे हे इंजिन अमेरिकेच्या जनरल इलेक्ट्रिक या कंपनीकडून घेण्याचा करार एचएएलने केला. मात्र, विविध कारणांमुळे गेल्या सहा वर्षांत एकही इंजिन एचएएलला प्राप्त झालेले नाही. परिणामी भारतीय हवाई दलाला जबर फटका बसत आहे. म्हणूनच हवाई दल प्रमुखांनी दोन वेळा एचएएलच्या कारभाराचे चांगलेच वाभाडे काढले आहेत. भारतीय हवाई दलाकडे सध्या मिराज, जग्वार, मिग, सुखोई आणि राफेल ही लढाऊ विमाने आहेत. यातील मिराज, जग्वार आणि मिग ही जुन्या पिढीची आहेत.

येत्या सात ते आठ वर्षांत ही सर्व विमाने निवृत्त होतील. भारतीय वायू दलाकडे लढाऊ विमानांच्या ४५ ते ४८ तुकड्या असणे अपेक्षित आहे. सद्यस्थितीत या तुकड्यांची संख्या ३५ च्या आसपास असल्याचे सांगितले जाते. वरील विमाने निवृत्त झाली तर या तुकड्यांची संख्या २०च्या खाली येण्याची चिन्हे आहेत. अशा स्थितीत नवीन लढाऊ विमाने जर हवाई दलाला मिळाली नाही तर काय होईल? पाकिस्तान व चीनसारखे शत्रू भारताविरोधात कारवाईसाठी संधी शोधत असताना आपण असे हातावर हात धरून बसणे योग्य ठरेल का?

‘ऑपरेशन सिंदूर’च्या निमित्ताने भारत सरकार आणि संरक्षण विभागाने खरे तर खडबडून जागे होणे आवश्यक आहे. तेजस या लढाऊ विमानांची ऑर्डर २०३५ ते २०४० पर्यंत पूर्ण होणार असेल तर ते कितपत उपयुक्त ठरेल? दिवसागणिक तंत्रज्ञान बदलत आहे. चीनकडे सद्यस्थितीत सहाव्या पिढीची लढाऊ विमाने आहेत. त्यामुळे अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा मुकाबला करणारी विमाने भारतीय वायू दलाकडे असणे अपेक्षित आहे. अवघ्या चार ते पाच वर्षांत ही सर्व तेजस विमाने मिळू शकतील का? याचा विचार व्हायला हवा. अन्यथा यातील काही विमाने युद्धपातळीवर उत्पादित करून उर्वरित ऑर्डर रद्द करायला हवी. राफेल, सुखोई ५७ सारखी आधुनिक विमाने घेण्याचाही पर्याय आहे. ही विमानेही कमीत कमी कालावधीत उपलब्ध व्हायला हवीत.

लढाऊ विमानांच्या निर्मितीस हजारो कोटी रुपये खर्च येतो. त्याऐवजी हलक्या वजनाचे ड्रोन आणि यूएव्ही यांचा पर्याय समोर आला आहे. ‘आत्मनिर्भर भारत’ आणि ‘मेक इन इंडिया’ या अंतर्गत या दोन्ही आयुधांचे जलद गतीने उत्पादन आणि ती अत्याधुनिक स्वरूपाची असावीत याकडे लक्ष द्यायला हवे. ‘एस ४००’सारखी रशियन बनावटीची हवाई संरक्षण प्रणाली आपण वापरत आहोत. मात्र, पाचपैकी केवळ तीनच ऑर्डर रशियाने पूर्ण केल्या आहेत. अन्य दोन केव्हा मिळतील? तसेच ही प्रणाली देशांतर्गत पातळीवर निर्माण होऊ शकेल का? याचाही विचार व्हायला हवा. आजच्या स्पर्धेच्या आणि आधुनिक काळात युद्धासारख्या आव्हानात्मक प्रसंगात दुसऱ्या देशावर अवलंबून राहण्याने पराभवाची वाट सुकर होते. त्यामुळे देशांतर्गत पातळीवर हवाई संरक्षण प्रणालीतील विविध आयुधांच्या निर्मितीला चालना द्यायला हवी. विविध देशांकडे असलेल्या या प्रणालीचा स्वीकार करणे, तंत्रज्ञान हस्तांतरावर जोर देणे, देशांतर्गत उत्पादन वाढविणे, संशोधन आणि विकासाला सतत चालना देणे ही आजच्या काळाची गरज आहे. भारतीय लष्कराला तब्बल तीन दशकांनंतर नवीन तोफा उपलब्ध झाल्या. असाच वेग आपण ठेवला तर शूर व पराक्रमी सैन्याला मागास आयुधे देऊन आपण जायबंदी करणार आहोत. काळाची गती ओळखून निर्णय घेणारा आणि त्याबरोबर चालणाराच टिकतो. बाकी सर्व काळाच्या आड गायब होतात. हा निसर्ग नियम आपण कायमस्वरूपी लक्षात ठेवणे आवश्यक आहे. ‘ऑपरेशन सिंदूर’चा ढोल बडविण्याऐवजी त्यातून योग्य तो धडा घेऊन देशाची हवाई संरक्षण प्रणाली सक्षम व सज्ज करण्यातच शहाणपण आहे. अन्यथा दहशतवादी आणि भारतीय शत्रू कधी घात करतील याचा काहीच नेम नाही.

# जनगणनेची द्वाही



तब्बल १६ वर्षांनंतर अखेर देशाच्या जनगणनेचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. दर दहा वर्षांनी होणारी ही प्रक्रिया २०२१ मध्ये होणे अपेक्षित होते, पण त्या वेळी करोनाची साथ असल्याने ती होऊ शकली नाही. अखेर बुधवारी याबद्दलची घोषणा झाली. ऑक्टोबर २०२६ पासून उत्तरेकडील हिमवृष्टी होणाऱ्या राज्यांमध्ये जनगणना सुरू होईल. नंतरच्या टप्प्यात अन्य राज्यांत १ मार्च २०२७पासून ही प्रकिया सुरू होणार आहे. यावेळच्या जनगणनेचे वैशिष्ट्य म्हणजे सोबतच होणारी जातगणना.

जनगणनेदरम्यानच जातीवर आधारित माहिती गोळा केली जाईल. या वेळी जातींचे वितरण, सामाजिक-आर्थिक स्थिती, शैक्षणिक स्थिती आणि संबंधित घटकांची माहिती घेतली जाणार आहे. जातिनिहाय आरक्षणांसंदर्भात देशभर चर्चा आणि आंदोलने सुरू असताना जातनिहाय लोकसंख्येची नेमकी आकडेवारी हातात असणे गरजेचे आहे. १८८१ ते १९३१ पर्यंत ब्रिटिश राजवटीत जातगणना ही जनगणनेसोबत होत होती. १९५१ मध्ये स्वतंत्र भारताच्या पहिल्या जनगणनेदरम्यान सरकारने ही पद्धत बंद केली.

त्यामुळे सध्याचे आरक्षण १९३१ च्या आकडेवारीवर आधारित आहे. होऊ घातलेल्या जनगणनेची आकडेवारी समोर येण्यासाठी मात्र २०३० उजाडेल; तोवर २०२९ ची लोकसभा निवडणूक होऊन गेलेली असेल. त्यामुळे जातजणनेच्या आकड्यांवर राजकारणाची दिशा ठरवण्याचे राजकीय पक्षांचे मनसुबे येत्या निवडणुकीत तरी पूर्ण होण्याची शक्यता नाही. तेच मतदारसंघांच्या फेररचनेबाबतही होणार आहे.


२०३० नंतरच या संदर्भातील निर्णय घ्यावे लागतील, असे दिसते. मतदारसंघांची फेररचना हा अनेक राज्यांसाठी चिंतेचा मुद्दा ठरत आहे; विशेषतः दक्षिणेतील राज्यांना ही चिंता अधिक भेडसावते आहे. या राज्यांतील मतदारसंघांची संख्या कमी होण्याची शक्यता असून उत्तरेकडील राज्यांत लोकसंख्यावाढीचे संकेत असल्याने मतदारसंघ वाढण्याची शक्यता आहे. लोकसंख्या नियंत्रणासाठी प्रयत्न केल्याचा फायदा मिळण्याऐवजी प्रतिनिधित्व कमी होणे हे अन्यायकारक असल्याची या राज्यांची भावना आहे, जनगणनेचे आकडे समोर आल्यानंतरच यावर अंतिम निर्णय होऊ शकेल.

महिला आरक्षणाची घोषणाही केंद्र सरकारने २०२३मध्येच करून ठेवली आहे; त्या वेळी हे आरक्षण जनगणनेनंतर लागू होईल, असे सांगण्यात आले होते. संसद आणि विधिमंडळात एक तृतीयांश जागांवर महिला दिसण्यासाठीही २०३४च्या निवडणुकीची प्रतीक्षा करावी लागेल. देशाची धोरणे आणि दिशा ठरवण्यासाठी अत्यंत गरजेची असलेली बहुप्रतीक्षित जनगणना अखेर जाहीर झाली आहे. देशाच्या विकासप्रक्रियेतील ही महत्त्वाची पायरी ठरेल.

# पनीर कटलेट

**साहित्य :** २०० ग्रॅम पनीर कुस्करून, २ मध्यम आकाराचे कांदे चिरून, १ गाजर किसून, १ वाटी बारीक चिरलेला कोबी, २ बटाटे उकडून कुस्करून, १ चमचा आले-लसूण पेस्ट, १ चमचा मिरची-कोथिंबीर पेस्ट, २ मोठे चमचे कॉर्नफ्लॉवर, गरजेनुसार मिठ, पाव ते अर्धा वाटी तेल, चाट मसाला.

**कृती :** भांड्यात तेल गरम करून त्यावर चिरलेला कांदा घाला. कांदा गुलाबी रंग येईपर्यंत शिजला की त्यावर



आले-लसूण पेस्ट व मिरची-कोथिंबीर पेस्ट घालून ढवळा. वरील मिश्रणावर कोबी, गाजर घालून २-३ मिनिटेच परतवत शिजवा. चायनीज पदार्थांसारखेच जास्त शिजू देऊ नका. आता कुस्करलेले बटाटे, मिठ घालून पुन्हा चांगले ढवळून लगेच गॅस बंद करा. हे मिश्रण एका ताटात पसरवा व जरा थंड होऊ द्या. मिश्रण थंड झाले की त्यात पनीर व कॉर्नफ्लॉवर टाकून मिश्रण एकजीव करा. आता तुम्हाला हव्या त्या आकाराचे कटलेट करा. व नॉनस्टिक पॅनवर जरासेच तेल घालून शॅलो फ्राय करून घ्या. दोन्ही बाजू मध्यम आचेवर साधारण ५-६ मिनिटे शिजवा. कटलेट तयार झाले की गरम असतानाच त्यावर चाट मसाला टाका. नुसते किंवा सॉस किंवा पुदिना चटणीबरोबर याचा आस्वाद घ्या.

**अधिक टिप :**

- **या कटलेटमध्ये इतर कोणतेही मसाले न वापरल्याने पनीर व भाज्यांचा अस्सल स्वाद येतो.**
- **लहान मुलांना तर खूपच आवडतात. शिवाय कोबीसारखी भाजी खाल्ली जाते.**
- **यात अजून कांद्याची पात, किंवा आपल्या आवडीच्या भाज्या थोड्या प्रमाणावर घालू शकता.**

# न्यूड मेकअप लूकसाठी काही टिप्स



**न्यूड मेकअप लूकचा सध्या खूपच वापर केला जातो. यासाठी ब्लॅक मस्कराचा वापर करा. आपल्याला त्वचेला सूट होईल असा नैसर्गिक रंग आणि गुलाबी रंगाच्या लिप कलरचा वापर करा. आकर्षक दिसण्यासाठी न्यूड मेकअप लूकसाठी कोणत्या टिप्सचा वापर केला पाहिजे, ते जाणून घ्या.**

- आपल्या डोळ्यांना नॅचरल लूक देण्यासाठी पापण्यांना ब्लॅक मस्करा लावा आणि केस कुरळे करा.
- डोळ्यावरच्या आतील कोपऱ्यापर्यंत काजळ लावा. त्यामुळे पापण्या सुंदर आणि आकर्षक दिसतील.
- गालावर नॅचरल चमक येण्यासाठी चीकबोन्सला हायलाइट करा. सध्या न्यूड मेकअप लूकसाठी आपल्या त्वचेला सूट होईल अशा नॅचरल शेडची निवड करा.
- यासाठी हलक्या रंगाचा वापर करा. चेहरा चमकण्यासाठी ओठांना हलक्या गुलाबी रंगाची पिंक शेडची लिपस्टिक लावून त्यावर शाईन येण्यासाठी लिप ग्लॉसचा वापर करा. त्यामुळे अजूनच आकर्षक लूक येईल.
- न्यूड मेकअप लूकसाठी एकाच रंगाच्या वेगवेगळ्या शेड्सचा वापर करा.
- न्यूड शेड्स लावण्याआधी लाईट बेस लावा आणि आवश्यक असल्यास हलक्या हातांनी लूज पावडर किंवा कॉम्पॅक्ट पावडर लावा.

# गरम पाणी पिण्याचे फायदे

**बहुतेक लोक आपल्या दिवसाची सुरुवात चहा किंवा कॉफीच्या गरमागरम कपाने करत असतात. काही लोकांना तर सकाळी उठल्या उठल्या चहा किंवा कॉफी मिळाली नाही, तर त्यांचा अख्खा दिवस वाईट जातो, इतकी त्यांना चहा किंवा कॉफीची सवय झालेली असते. पण या सवयीमुळे कालांतराने बद्धकोष्ठ, पोटदुखी, ॲसिडिटी, पिंपल्स अशा तक्रारी सुरू होतात. असे म्हटले जाते की त्वचा, केस आणि एकंदर शरीराचे आरोग्य सांभाळण्यासाठी भरपूर पाणी पिणे आवश्यक आहे. त्याचबरोबर सकाळी उठल्या उठल्या एक ग्लास गरम पाणी पिण्याची सवयही तुमच्या शरीरातील अनेक विकार मुळापासून दूर करू शकते.**

**सकाळी** उठून नियमितपणे एक ग्लास गरम पाणी प्यायल्याने पचन शक्ती चांगली राहते. तसेच गरम पाणी प्यायल्याने शरीरातील रक्ताभिसरणही चांगले राहते. आपल्या खाण्या-पिण्याच्या अयोग्य सवयींमुळे आपल्या शरीरामध्ये साठत असलेले घातक पदार्थ गरम पाण्याच्या सेवनामुळे बाहेर टाकण्यास मदत होते. तसेच गरम पाण्याच्या नियमित सेवनामुळे शरीरातील अतिरिक्त चरबी घटण्यास मदत होऊन वजन कमी होण्यास मदत होते. योगशास्त्राच्या नियमानुसार तीन महिने गरम पाण्याच्या सेवनाने वजन कमी होऊ शकते. याकरिता इतर कोणतीही विशेष पथ्ये पाळण्याची गरज नाही.

काही लोकांना बद्धकोष्ठाचा त्रास होतो. अशा वेळी सकाळी रिकाम्यापोटी गरम पाणी पिणे फायदेशीर ठरू शकते. पुष्कळ महिलांना मासिक धर्माच्या दिवसांमध्ये डोकेदुखी सतावते. त्यावेळी नियमित गरम पाण्याचे सेवन केल्याने डोकेदुखीपासून आराम मिळतो. तसेच या दिवसांमध्ये होणारी पोटदुखी ही गरम पाण्याच्या सेवनामुळे कमी होते.



दररोज सकाळी एक ग्लास गरम पाण्यामध्ये थोडासा लिंबाचा रस घालून प्यायल्याने शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढते. ज्यांना सतत बारीकसारीक तब्येतीच्या तक्रारी जाणवत असतील त्यांनी गरम पाणी आणि लिंबाच्या रसाचे दररोज सेवन करणे उत्तम. यामुळे त्वचेचे आरोग्य देखील चांगले राहून, त्वचेवर पिंपल्स येणे कमी होते. तसेच गरम पाण्याच्या सेवनाने ॲसिडिटीचा त्रासही कमी होतो. पुष्कळ लोकांच्या खाण्या-पिण्याचे वेळापत्रक किंवा झोपेच्या वेळा अतिशय अनियमित असतात. शिवाय ज्या लोकांना काही ना काही कारणाने सतत प्रवास करावा लागतो. त्यांनाही बाहेरच्या जेवणावरच काम चालवून घ्यावे लागते. परिणामी ॲसिडिटीसारखे विकार पाठीमागे लागतात. अशा वेळी दररोज सकाळी गरम पाणी पिण्याच्या सवयीने ॲसिडिटीचे प्रमाण कमी होते.

# मासिक पाळी पुढे ढकलताय?

**सण, समारंभ, पर्यटन किंवा धार्मिक कार्याच्या आड येणारी मासिक पाळी पुढे ढकलण्याचा निर्णय अनेक महिला घेतात. मात्र अशा प्रकारे निसर्गचक्रात हस्तक्षेप करणं चुकीचं आहे. बरंच प्रबोधन होऊनही मासिक पाळीबाबतचे गैरसमज कमी झालेले नाहीत. म्हणूनच महिलांना कृत्रिम पद्धतीने पाळी पुढे ढकलावी लागते. मासिक पाळी पुढे ढकलण्यासाठी गोळ्या घेतल्या जातात. पण या गोळ्यांचे शरीरावर दीर्घकालीन परिणाम होतात.**

- मासिक पाळी पुढे ढकलणाऱ्या गोळ्यांच्या सततच्या सेवनामुळे यासंदर्भातल्या नैसर्गिक चक्रावर परिणाम होऊ शकतो. शिवाय महिलांच्या प्रजननक्षमतेवरही याचे घातक परिणाम दिसून येतात.
- या गोळ्यांचं सेवन केल्यानंतर पुढचा काही काळ मासिक पाळीदरम्यान मोठ्या प्रमाणावर रक्तस्राव होण्याची शक्यता वाढते. जवळपास २० टक्के महिलांना हा अनुभव येतो. पुढचे काही महिने मासिक पाळीतून अधिक प्रमाणात रक्त जाऊ शकतं.
- या गोळ्या बऱ्याच काळपर्यंत घेत राहिल्यास आरोग्यावर अत्यंत घातक असे परिणाम दिसून येतात. नसांमध्ये रक्ताची गुठळी होण्यासारख्या समस्या जाणवू शकतात. या गोळ्यांमुळे इतर औषधांच्या शरीरावरच्या प्रभावावर विपरित परिणाम होऊ शकतो.
- या गोळ्या घेतल्यानंतर इतर काही दुष्परिणाम होऊ शकतात. जुलाब, हातापायांमध्ये गोळे येणं, अवेळी रक्तस्राव होणं हे दुष्परिणाम दिसून येऊ शकतात.



# कोरफडीचे ५ गुणकारी फायदे

**कोरफड त्वचेसाठी खूप फायदेशीर आहे. याच्या नियमित सेवनाने त्वचेसंबंधित अनेक समस्या दूर होतात. जाणून घ्या कोरफडीचे गुणकारी फायदे...**

- सतत कॉम्प्युटरसमोर बसल्याने डोळ्यांवर ताण येतो. डोळ्यांचे आरोग्य चांगले राहाण्यासाठी दोन चमचे कोरफडीचा गर एक कप पाण्यात मिसळून त्याने डोळे धुवा. यामुळे डोळ्यांना आराम मिळेल.
- चेहऱ्यावर पुटकुळ्या आल्यास कोरफडीचा गर चेहऱ्यावर लावा. थोड्या वेळाने चेहरा साध्या पाण्याने धुवा. यामुळे पुटकुळ्या कमी होतील.
- शरीरावर कापल्यामुळे जखम झाली असल्यास त्यावर कोरफडीचा गर लावा.
- कोंड्याची समस्या असल्यास दोन चमचे कोरफडीचा गर कंडिशनरसोबत मिसळा. यामुळे कोंड्यापासून सुटका होईल.
- दातांच्या हिरड्या मजबूत करण्यासाठी हिरड्यांवर कोरफडीचा गर लावा.

# जाणून घ्या टिकली लावल्याने होणारे फायदे



**टिकलीचाही महिलांच्या १६ शृंगारांमध्ये समावेश असून सौभाग्यवती महिला काही वर्षांपूर्वी कुंकवाचा वापर करत असत. पण कुंकवाचा वापर न करता टिकलीचा वापर सध्या महिलावर्ग मोठ्या प्रमाणात करताना पाहायला मिळतात. महिला चेहऱ्यावर लावण्यात आलेल्या टिकलीमुळे केवळ सुंदरच दिसत नाहीत तर त्याचे अनेक आरोग्यदायी फायदेही आहेत. टिकलीचा वापर सामान्यत: महिला ट्रेडिशनल लूकसाठी करतात. पण एका अभ्यासानुसार आरोग्यालाही टिकलीमुळे अनेक फायदे होतात. यामुळेच टिकलीचा वापर अनेक महिला करत आहेत. एवढेच नाही तर वेस्टर्न कपडे परिधान करणाऱ्या महिलाही आपल्या ड्रेसनुसार कलरफुल टिकली वापरण्यास सुरुवात करत आहेत. चेहऱ्यावरील टिकलीमुळे महिला खुपच सुंदर दिसतात आणि त्यामुळे अनेक आरोग्यदायी फायदेही होतात. कपाळावर टिकली लावण्याने अनेक फायदे होतात.**

**कपाळावर** टिकली लावल्यामुळे डोके दुखणे बंद होते. ॲक्युप्रेशर शास्त्रानुसार कपाळावर ज्या ठिकाणी टिकली लावण्यात येते, त्या जागेवर मसाज केल्यास डोकेदुखी तत्काळ बंद होते. टिकली लावलेल्या जागेवर मसाज केल्यास नाकाच्या आसपास ब्लड सर्क्युलेशन चांगल्या पद्धतीने होण्यास सुरुवात होते, ज्यामुळे तुम्हाला खूपच आराम मिळतो.

टिकली दोन्ही भुवयांच्या मध्यभागी ज्या ठिकाणी लावली जाते, शरीरातील सर्व नसा त्याच केंद्रावर एकत्र येतात. टिकली लावण्यात येणाऱ्या या जागेला अग्निचक्र या नावाने सुद्धा ओळखले जाते. म्हणूनच टिकली लावल्याने एकाग्रताही वाढते आणि मन शांत राहते. तसेच, टिकली लावल्याने ताणतणावही कमी होतो.

तुम्हाला पूर्ण झोप मिळत नाही आणि त्यामुळे तुम्ही त्रस्त आहात तर टिकली लावणे तुमच्यासाठी खूपच फायदेशीर होऊ शकते. टिकली शरीरच्या वरच्या भागाला शांत ठेवण्यासाठी खूपच फायदेशीर ठरते. कपाळावर टिकली लावल्याने चांगली झोप येते.

टिकली डोळ्यांच्या नसा मजबूत करण्यास खूपच मदत करते. टिकली कपाळ्याच्या मध्यभागी ज्या ठिकाणी लावली जाते, त्या ठिकाणच्या नसा आणि डोळ्यांमधील नसा यांच्यात एक कनेक्शन असते. टिकली डोळ्यांच्या नसांना मजबूत करण्यास मदत करते ज्यामुळे तुम्हाला एकदम स्पष्ट आणि साफ दिसण्यास मदत होते. एवढेच नाही तर टिकली लावल्याने आसपासचे मसल्स मजबूत आणि हेल्दी होतात.



तुमच्या चेहऱ्यावर जर सुरकुत्या पडण्यास सुरुवात होत आहे तर टिकली लावण्यास तुम्ही सुरुवात करा. कारण, टिकली लावल्याने चेहऱ्यावर येणाऱ्या सुरकुत्यांपासून सुटका मिळण्यास मदत होते.

# दुधाबरोबर मध घेण्याचे फायदे जाणून घेऊया

**आपल्याला** हे माहीतच आहे की, नियमित दूध पिणं आरोग्यासाठी फायदेशीर आहे; परंतु जर आपण दुधात मध घातले तर त्याचा फायदा दुपटीने होतो. असे केल्यास आरोग्यविषयक समस्यांपासून आपण मुक्त होऊ शकतो.

- दररोज एक कप दुधात मध घालून प्यायल्याने शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी फायदेशीर असते. हे दोन्ही प्रकारच्या क्षमता वाढवण्यास उपयुक्त आहे.
- अनिद्रेची समस्या असल्यास रात्री कोमट दुधात मध टाकून प्या, असे केल्यास अनिद्रेची समस्या नाहीशी होते आणि त्वरित आराम मिळतो.
- पचन सुधारण्यासाठी दुधात मध घालून पिण्याने बद्धकोष्ठतेच्या त्रासापासून सुटका होते.
- दुधात प्रथिने आणि कॅल्शियम भरपूर प्रमाणात असतात आणि मध रोग प्रतिकारक शक्ती वाढवण्यास सक्षम असतं. यांना एकत्र करून प्यायल्याने उत्तम आरोग्य पर्याय असल्याचे सिद्ध करतात.
- ताणतणाव दूर करण्याचे हे एक उत्तम साधन आहे. कोमट दुधात मध घालून प्यायल्याने प्रजनन क्षमता आणि शुक्राणूंची संख्या



# केसगळती रोखणारा 'वन मिनिट' उपाय!

**केसगळती ही काही प्रमाणात प्रत्येकामध्ये आढळून येते. केसगळतीचे प्रमाण दिवसाला १०० पेक्षा अधिक असल्यास ती समस्या गंभीर आहे. या समस्येचे एक कारण म्हणजे टाळूला होणारा अपुरा रक्तप्रवाह! मग त्यावरचा एक उपाय म्हणजे टाळूला मसाज करा.**



**केस** धुतल्यानंतर बोटांनी टाळूला मसाज करणे हा केसगळती रोखण्याचा एक सहज-सोपा घरगुती उपाय आहे. मग केसगळती रोखण्यासाठी जरूर टाळा या चुका!

**कसे आहे फायदेशीर?**

डॉ. एच. के. भाकरू यांच्या 'होम रेमेडीज फॉर कॉमन इएलमेंट्स' या पुस्तकात लिहिल्यानुसार थंड पाण्याने केस धुतल्यानंतर टाळूवर हातांच्या बोटांनी मसाज करावा. यामुळे डोक्याजवळील रक्तवाहिन्यांना चालना मिळाल्याने रक्तप्रवाह सुधारतो. परिणामी केसांची वाढदेखील सुधारते.



**तुम्ही काय कराल ?**

तुमच्या सोयीनुसार पाण्याचे तापमान, शाम्पूने केस धुवा. मात्र शेवटी ते कोमट किंवा साध्या पाण्याने धुवून निथळत ठेवा. यामुळे केस गुंतण्याची शक्यता कमी होते. केसांचे गुंतणे रोखण्यासाठी करून पहा हे उपाय.

काही वेळाने केस टॉवेलने पुसा आणि कोरडे करा. त्यानंतर हाताच्या बोटांनी गोलाकार दिशेने मसाज करा.

**खबरदारीचा उपाय**

मसाज करताना तो हळूवार आणि समान प्रमाणात असावा. खूप जोरजोरात केस घासणे, मसाज करताना नखांचा वापर करणे टाळा. यामुळे केसांचे नुकसान होऊ शकते.

## सायीचा उपयोग रंग उजळण्यासाठी करावा

- मुलतानी माती बारीक करून सायीत मिसळून चेहऱ्यावर तसेच कोपरावर लावल्यास रंग उजळतो.
- तीन चार बदाम आणि दहा बारा देशी गुलाबाच्या पाकळ्या वाटून त्यात एक चमचा साय मिसळून ते मिश्रण चेहऱ्यावर लावल्यास चेहऱ्यावरच्या सुरकुत्या आणि काळे डाग नाहीसे होतात.
- सायीत समुद्र फेसची बारीक पावडर मिळवून लावल्यास चेहऱ्यावरची मुरमे बरी होतात.



- मोसंबी किंवा संत्र्याची सालं वाटून त्यात साय मिसळून त्याचा लेप लावल्यास त्वचा मुलायम व स्वच्छ होते.
- एक चमचा साय व एक चमचा सफरचंदाचा रस एकत्र करून फेटून हलक्या हाताने चेहऱ्यावर मालीश केल्यास चेहऱ्याचा रंग उजळतो.
- सायीचा उपयोग औषधासारखाही होतो.

# दही कधी खावे?

**संपूर्ण** वर्षभरामध्ये ज्या ऋतूमध्ये दही अगदी निषिद्ध समजले पाहिजे, असा ऋतू म्हणजे वसंत. वसंत म्हणजे थंडीनंतर येणारा उन्हाळा, सध्या सुरू असलेले दिवस. वसंत ऋतूमधील कफ प्रकोपाचा विचार करता पाळावयाचा नियम म्हणजे दही वर्ज्य करणे. शरीरामध्ये कफ वाढवणारे दही वसंत ऋतूमध्ये सेवन करण्याचा निषेध शास्त्राने केला हे स्वाभाविकच आहे. वसंत ऋतूमधील दह्याचे काही विशिष्ट गुणदोष असतात. ते दही गोड व आंबट चवीचे असते. गोड व आंबट हे दोन्ही रस वसंतामध्ये टाळणे अपेक्षित आहे. ते शरीरामध्ये स्निग्धत्व वाढवणारे असते. वसंत ऋतूमध्ये स्निग्धत्व वाढवणारा आहार टाळायचा असतो. याशिवाय वसंतातल्या दह्याचा अजून एक दोष म्हणजे ते वातल (वात वाढवणारे) असते. त्यामुळे वात प्रकृतीच्या व्यक्तींना, वातविकाराने त्रस्त लोकांना ते योग्य नाहीच.

याशिवाय दही हे अभिष्यन्दी आहे, म्हणजे स्राव वाढवणारे आहे, ज्या दोषामुळे शरीरामध्ये पाणी वाढते. वसंत ऋतूमध्ये आधीच कफ पातळ झाल्यामुळे शरीरामध्ये स्राव, पाणी वाढलेले असताना दह्याचा शास्त्राने निषेध केलेला आहे. दही हे सूज सुद्धा वाढवते, अर्थात अतिप्रमाणात व अवेळी सेवन केले तर. दह्याबाबत वसंत ऋतू ही अवेळ आहे. वसंतामध्ये कफाचा जोर असताना सांधे हे कफाचे स्थान असल्याने सांध्यामधल्या श्लेष्मल त्वचेला सूज येण्याची व त्या श्लेष्मल त्वचेमधून स्राव वाढण्याची शक्यता बळावते. म्हणूनच सूज व स्राव वाढवणाऱ्या दह्याचा त्याग या दिवसांमध्ये करायचा आहे. अर्थात जिथे-जिथे स्राव स्रवतात, ते स्राव वाढवण्याचा, जिथे-जिथे सूज आहे तिथे सूज वाढवण्याचा धोका वसंतामध्ये दही खाल्ल्याने बळावतो.

या दिवसांमध्ये उन्हाळा सुरू झाला म्हणून दह्याचे सेवन सुरू केल्यानंतर विविध कफविकार, उष्णतेचे विविध रोग आणि सूजसंबंधित विकृती झाल्याचे अनुभव दरवर्षी अनुभवायला मिळतात.

उपचाराला दही न खाण्याची जोड दिली तरच हे आजार बरे होतात. केवळ औषधोपचारानंतर आजाराची लक्षणे कमी होतात; पण तात्पुरती; दही खाणे थांबवल्यानंतर मात्र या रुग्णांना आराम मिळालेला दिसतो.



# ऐन कामाच्या वेळी फोन नेटवर्कने धोका दिला? बदला ही सेटिंग, खराब नेटवर्कमध्येही करता येईल कॉल

**फोनमध्ये खराब नेटवर्क असल्यास कॉल करताना खूप त्रास होतो. महत्त्वाची कामंसुद्धा यामुळे रखडू शकतात. तुम्हालाही दररोज या समस्येचा सामना करावा लागत असेल, तर वाय-फाय कॉलिंग तुमची मदत करेल. या ट्रिकच्या मदतीने तुम्ही खराब नेटवर्कमध्येही स्पष्ट व्हॉइस कॉल करू शकाल. ही खास युक्ती अँड्रॉइड तसेच आयफोन युजर्ससाठी आहे. वाय-फाय कॉलिंगसाठी तुम्हाला वाय-फायमध्ये प्रवेश आवश्यक आहे. यानंतर फोनचे नेटवर्क खराब असले तरीही तुम्ही आरामात कॉल करू शकाल. अँड्रॉइड स्मार्टफोनवर वाय-फाय कॉलिंग कसे सुरू करावे ते पाहा.**

**गुगल पिक्सेल डिव्हाइसेस**

सर्वात आधी फोनच्या सेटिंगमध्ये जा. नेटवर्क आणि इंटरनेट पर्यायावर टॅप करा नंतर कॉल आणि एसएमएस पर्यायावर जा. वाय-फाय कॉलिंग पर्याय शोधा आणि उघडा. वाय-फाय कॉलिंग वापरण्यासाठी टॉगल चालू करा.

**वन प्लस युजर्स**

फोनच्या सेटिंग्जमध्ये दिलेल्या मोबाइल नेटवर्क पर्यायावर जाऊन सिम १ वर टॅप करा. नंतर वाय-फाय कॉलिंगचा पर्याय शोधा आणि उघडा. वाय-फाय कॉलिंग चालू करा. येथे तुम्ही उपलब्ध नेटवर्कमध्ये वाय-फाय आणि सेल्युलर कॉलिंगचे प्राधान्य देखील सेट करू शकता.



**आयफोनवर वाय-फाय कॉलिंग कसे सक्रिय करावे?**

सर्वप्रथम सेटिंगमध्ये दिलेल्या फोन ऑप्शनवर जा. नंतर वाय-फाय कॉलिंग पर्यायावर टॅप करा. वाय-फाय कॉलिंग चालू करण्यासाठी टॉगल चालू करा. जर वाय-फाय कॉलिंग सेवा उपलब्ध असेल, तर तुम्हाला स्क्रीनवर ऑपरेटरच्या नावापुढे वाय-फाय दिसेल.

**सॅमसंग आणि बहुतेक अँड्रॉइड डिव्हाइसेस**

प्रथम फोन ॲप उघडा. नंतर वरच्या उजव्या बाजूला दिलेल्या थ्री डॉट्सवर टॅप करा. सेटिंग्ज उघडण्यासाठी टॅप करा. येथे तुम्हाला वाय-फाय कॉलिंगचा पर्याय दिसेल. ते उघडा आणि टॉगल चालू करा.

# बर्फाच्या पाण्याचे सेवन करत असाल तर सावधान!

**उन्हाळ्यात** तहान भागवण्यासाठी आपण सगळेच थंड पाणी पितो अथवा बर्फ टाकून पाणी पितो, मात्र अधिक थंड पाणी प्यायल्यामुळे पचनास त्रास होतो. यामुळे आरोग्याशी संबंधित अनेक समस्या निर्माण होतात.

- थंड पाण्यामुळे नसा आखडतात. यामुळे पचनाची क्रिया संथ होते आणि बद्धकोष्ठता, गॅस यासारख्या समस्या निर्माण होतात.
- उन्हाळ्यात बाहेरचे तापमान अधिक असते. यात थंड पाणी प्यायल्यास छातीत कफ जमा होऊ लागतो. थंड पाणी प्यायल्यानंतर शरीराचे तापमान मेंटेन करण्यासाठी शरीराला मोठ्या प्रमाणात एनर्जी खर्च करावी लागते. याचा परिणाम पचन संस्थेवर होतो.



- थंड पाण्यामुळे नसा संकुचित होतात. यामुळे हृदयाला ब्लड पंप करण्यासाठी जास्त मेहनत करावी लागते. यामुळे हार्ट बीट संथगतीने होतात.
- थंड पाणी प्यायल्याने प्रतिकारक क्षमता कमी होते. यामुळे ॲलर्जी तसेच आजारांची भीती वाटते.
- थंड पाणी प्यायल्याने शरीराचे तापमान अचानक बदलते. ज्याचा परिणाम डोकेदुखीसारख्या समस्या उद्‌भवतात.

## पहिल्याच दिवशी मिळणार विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य

# बीएमसी करणार ९० कोटी खर्च

**मुंबई** : मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या साडेतीन लाख विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवशी शैक्षणिक साहित्य वितरीत करण्यात येणार आहे. या साहित्यामध्ये गणवेश, वह्या, कंपासपेटी, चित्रकलेसाठी आवश्यक साहित्य, पेन्सिल, पाण्याची बाटली, डबा, दफ्तर, बूट, सॅण्डल, मोजे आदी वस्तूंचा समावेश आहे. यासह इयत्ता आठवी, नववी आणि दहावीच्या प्रत्येक विद्यार्थ्यांकरिता शालेय वेळेत अभ्यासासाठी आधुनिक टॅबही उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यासाठी पालिका प्रशासन एकूण ९० कोटी रुपये खर्च करणार आहे.




**विद्यार्थ्यांना देणार टॅब**

इयत्ता आठवी, नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांना पारंपरिक पद्धतीच्या अभ्यासासह आधुनिक पद्धतीचाही सराव व्हावा, तंत्रज्ञानाची माहिती व्हावी यासाठी शालेय वेळेत टॅब उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या टॅबमुळे विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षण घेण्यास मदत होणार आहे. टॅब कसा हाताळावा, त्याचा अभ्यासात उपयोग कसा करावा, याबाबत शिक्षकही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असल्याचे पालिकेच्या शिक्षण विभागाने दिली.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षापासून शैक्षणिक साहित्य मोफत वितरीत करण्याचा उपक्रम राबवित आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना गणवेश, वह्या, कंपासपेटी, चित्रकलेसाठी आवश्यक साहित्य, पेन्सिल, पाण्याची बाटली, डबा, दफ्तर, बूट, सॅण्डल, मोजे आदींचा समावेश आहे. बालवाडी ते इयत्ता दहावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या साडेतीन लाख विद्यार्थ्यांना हे साहित्य दिले जाणार आहे. सर्व शाळांमध्ये हे साहित्य पोहोचविण्यात येत आहे. शाळानिहाय वाटपाचे नियोजनही पूर्ण झाले आहे. तसेच विद्यार्थ्यांना शालेय अभ्यासक्रमातील क्रमिक पुस्तके राज्य शासनाकडून देण्यात येणार आहेत.

# मुंबईच्या मिठी नदीतील गाळ दिव्यात डम्प

**ठाणे** : मुंबईतील मिठी नदीतून काढण्यात आलेला सडलेला, रासायनिक आणि जैविकदृष्ट्या अत्यंत धोकादायक गाळ कोणतीही पूर्वसूचना, कायदेशीर परवानगी किंवा प्रक्रिया न करता ठाणे जिल्ह्यातील दिवा परिसरात डम्प करण्यात येत आहे. ही कृती केवळ बेकायदा नसून परिसरातील हजारो नागरिकांच्या आरोग्यावर थेट परिणाम करणारी आहे. यामुळे संपूर्ण परिसरात उग्र वास, डासांची पैदास, वाऱ्यामुळे पसरणारी दुर्गंधी आणि पाणवठ्यांचे दूषितीकरण सुरू झाले आहे.

गाळाची संरक्षित विल्हेवाट लावण्याऐवजी नागरिकांच्या दैनंदिन राहत्या परिसरात तो डंप करणे हे केवळ असंवेदनशील नव्हे तर अशा कृतीसाठी जबाबदार अधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाई व्हावी, इतके गंभीर आहे.

विशेष म्हणजे या गाळात सांडपाण्याचे रासायनिक घटक, धातू, सेंद्रिय घनकचरा, प्लास्टिक आणि औद्योगिक मलमूत्राचे मिश्रण असल्याचे विविध अभ्यासांमधून सिद्ध झाले आहे. अशा घातक गाळाच्या डंपिंगमुळे नागरिकांना त्वचेच्या विकारांपासून ते श्वसनाच्या समस्यांपर्यंत त्रास होत आहेत. शाळकरी विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले असून, आरोग्य खात्याकडून कोणतीही चौकशी अद्याप झालेली नाही. हा सर्व प्रकार जाणीवपूर्वक दुर्लक्षित करून एक प्रकारे दिवा परिसरातील नागरिकांना डंपिंग ग्राउंडवर जगण्यास भाग पाडले जात आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाचे दुर्लक्ष, ठाणे महापालिकेची मूक भूमिका आणि महापालिकेतील ठेकेदारांच्या मनमानी यामुळे परिसरातील नागरिकांत तीव्र संताप आहे. जर लवकरात लवकर हा गाळ हटवून परिसर निर्जंतुक करण्यात आला नाही, दोषींवर कारवाई झाली नाही आणि भविष्यात असा प्रकार थांबवण्याची लिखित हमी दिली गेली नाही, तर दिव्यातील जनतेकडून तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा कल्याण ग्रामीण विधानसभा प्रमुख रोहिदास मुंडे यांनी दिला आहे.



या प्रकाराविरोधात ठाकरे पक्षाचे कल्याण ग्रामीण विधानसभा प्रमुख रोहिदास मुंडे यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, राष्ट्रीय हरित लवाद आणि राष्ट्रीय मानवाधिकार आयोग माजी पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांच्याकडे अधिकृत तक्रारी दाखल केल्या आहेत. तरीही संबंधित ठेकेदार, महानगरपालिका प्रशासन आणि पर्यावरण विभाग या सर्वांकडून अघोषित मौन पाळण्यात येत आहे.

# ऑगस्ट क्रांती मैदानावर नमाज पठणाबाबत निर्णय घ्या!

**मुंबई** : शहरातील ऑगस्ट क्रांती मैदानावर नमाज पठण करण्याच्या निवेदनावर आजच निर्णय घ्या, असे आदेश उच्च न्यायालयाने शुक्रवारी राज्य सरकारच्या सांस्कृतिक कार्य मंत्रालयाच्या सचिवांना दिले. ऑगस्ट क्रांती मैदानाच्या वापराची परवानगी केवळ सांस्कृतिक व्यवहार व सामाजिक न्याय मंत्रालयाचे सचिव असलेल्या सक्षम अधिकाऱ्याद्वारेच दिली जाऊ शकते, असे न्यायालयाने २००६ च्या आदेशाचा संदर्भ देत स्पष्ट केले.




संभाव्य वाहतूक समस्या आणि अशा धार्मिक कारणासाठी सार्वजनिक जागेचा वापर केल्यामुळे उद्भवू शकणाऱ्या कायदा आणि सुव्यवस्थेच्या परिस्थितीच्या कारणास्तव पोलिसांनी परवानगी नाकारली होती. याचिकाकर्ते गोपालानी ५० वर्षांपासून या जमिनीचा वापर करत आहेत. यादरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा कोणताही प्रकार घडलेला नाही, असा युक्तिवाद याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी केला. त्यावर राज्य सरकारतर्फे मुख्य सरकारी वकील हितेन वेणेगावकर यांनी बाजू मांडली. वाहतूक विभाग आणि पालिकेने परवानगी दिलेली नाही. परंतु याचिकाकर्त्यांनी अटींचे पालन केल्यास परवानगी दिली जाईल, असे ॲड. वेणेगावकर यांनी निदर्शनास आणले.

यासंदर्भात उमर अब्दुल जब्बार गोपालानी यांनी याचिका दाखल केली होती. याचिकेवर शुक्रवारी न्या. डॉ. नीला गोखले आणि मंजुषा देशपांडे यांच्या सुट्टीकालीन खंडपीठासमोर सुनावणी झाली. मुंबई पोलिसांच्या गावदेवी पोलीस स्टेशनने ऑगस्ट क्रांती मैदानावर सामूहिक नमाज पठण करण्यास परवानगी नाकारली होती. त्या आदेशाला उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते.

# शहरातील ध्वनी आणि जल प्रदूषणात वाढ

**भाईंदर** : मिरा-भाईंदर शहरामध्ये ध्वनी आणि जल प्रदूषणात वाढ झाली असल्याचे गुरूवारी महापालिकेने जाहीर केलेल्या पर्यावरण अहवालावरून स्पष्ट झाले आहे. विशेष म्हणजे महापालिकेने एकवर्षे जुनाच २०२३ -२४ पर्यावरण अहवाल जाहीर केल्याची चर्चा आहे. महापालिकेने अहवाल प्रसिद्ध करण्यासाठी तब्बल एक वर्षाचा विलंब केल्याचे सांगत नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे.

मिरा-भाईंदर शहराचा पर्यावरण अहवाल जाहीर करण्याची पर्यावरण प्रेमी नागरिकांकडून गेल्या एक वर्षापासून केली जात होती. परंतु, महापालिका प्रशासन त्याकडे दुर्लक्ष करत होते. शहरातील विविध भागातील हवा, ध्वनी, जल प्रदूषणाची शास्त्रीयदृष्ट्या चाचणी करून नागरिकांना प्रदूषणमुक्त जीवन जगण्यासाठी वातावरण तयार करण्याची जबाबदारी महापालिकेची आहे. त्यामुळे दरवर्षी महापालिकेकडून पर्यावरण अहवाल तयार केला जातो. साधारण ३१ जुलै पूर्वी हा अहवाल प्रसिद्ध करण्याचे शासनाचे सक्त आदेश आहेत. असे असताना महापालिकेकडून गेल्या दोन वर्षांपासून पर्यावरण अहवाल प्रसिद्ध करण्यात आला नाही. अखेर पर्यावरण दिनाचे औचित्य साधत गुरूवारी महापालिका प्रशासनाने २०२३-२४ चा एक वर्ष जुनाच पर्यावरण अहवाल प्रसिद्ध केला आहे. या अहवालात शहरातील अनेक धोकादायक बाबी उघडकीस आल्या आहेत.



तर वाढत्या शहरीकरणामुळे जैवविविधता धोक्यात आली असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. शहरातील जलस्रोतांच्या प्रदूषणात देखील वाढ झाली आहे. घोडबंदर, रेती बंदर खाडी, भाईंदर पश्चिम धक्का आणि घोडबंदर स्मशानभूमी नदी हे जलस्रोत सर्वाधिक प्रदूषित झाले आहेत. यामध्ये जैविक आणि रासायनिक प्रदूषकांचे प्रमाण अधिक असून, त्यामुळे पाण्याच्या गुणवत्तेत गंभीर घट झाली आहे.

महापालिकेने शहरातील ध्वनी पातळी तपासण्यासाठी १३ ठिकाणी सर्वेक्षण केले. त्यामध्ये काशीमिरा नाका व मिरारोड रेल्वे स्थानक परिसरात अनुक्रमे ७३.४ व ९४.६ डेसिबल सर्वाधिक ध्वनिप्रदूषण होत असल्याचे दिसून आले आहे. ध्वनी पातळीची मयार्दा ६५ डेसिबल असते. तरी देखील या दोन्ही ठिकाणी ध्वनी पातळीने ही मयार्दा ओलांडल्याचे दिसून येत आहे. घोडबंदर येथील फाउंटन हॉटेल येथे ७२.३ डेसिबल व भाईंदर येथील केबिन रोड परिसरात ६९.८ डेसिबल ध्वनी पातळी आहे. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात ध्वनिप्रदूषण होत आहे. उत्तन नाका व पाली चर्च या दोनच ठिकाणी ध्वनी पातळी मयार्देच्या आत असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. यामध्ये शहरातील ध्वनी व जल प्रदूषणाने काही ठिकाणी धोक्याची पातळी ओलांडली असल्याचे समोर आले आहे. तर हवा प्रदूषणात वाढ होत असली तरी हे प्रदूषण समाधानकारक पातळीच्या वर जात नसल्याचे म्हटले आहे.

विशेष म्हणजे, गणेशोत्सव काळात मूर्ती विसर्जनानंतर जलप्रदूषणात अधिक वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे. या खाड्यांचे पाणी थेट अरबी समुद्रात मिसळत असल्यामुळे प्रदूषणाचा व्यापक परिणाम किनारपट्टी परिसरातही जाणवत आहे. मिरा भाईंदर परिसरात शहरीकरण आणि औद्योगिकीकरणामुळे जैवविविधतेवर गंभीर धोका निर्माण झाला आहे. खाड्यांमधील अतिक्रमण, अनियंत्रित विकास, प्लास्टिकचा वापर, जलप्रदूषण आणि सांडपाण्याचा निचरा यामुळे खारफुटी क्षेत्रांचा ऱ्हास होऊन जलजीव आणि वन्यजीव धोक्यात आले आहेत.

# विलेपार्ले येथील आयुर्वेदिक दवाखाना उद्घाटनाच्या प्रतीक्षेत
# २ वर्षांपासून धूळखात पडल्याचा स्थानिकांचा आरोप

**मुंबई** : पालिकेने विलेपार्ले येथे कोट्यवधी रुपये खर्च करून उभारलेला मनोहर पर्रिकर आयुर्वेदिक दवाखाना गेले दोन वर्ष उद्घाटनाशिवाय धूळखात पडला आहे. यामुळे हा दवाखाना येत्या १५ दिवसांत सुरू करण्यात यावा, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

विलेपार्ले येथील शहाजी रोड येथे असलेला स्वर्गीय मनोहर पर्रिकर आयुर्वेदिक दवाखाना व आरोग्य केंद्र कोट्यवधी रुपये खर्च करून बांधण्यात आला. पालिकेने बांधलेली पाच मजली आयुर्वेदिक रुग्णालय इमारत उद्घाटनाशिवाय दोन वर्षे बंद आहे. या आरोग्य केंद्र आणि दवाखान्यातील इमारतीत वैद्यकीय उपकरणे तसेच इतर साहित्य उपब्लध करून देण्यात आले आहे, मात्र इमारतीतील



कक्षांसाठी आवश्यक असलेल्या लाकडी फर्निचरसाठी अजूनही टेंडर काढण्यात आलेले नाही. त्यामुळे इमारतीचे उद्घाटन रखडले असल्याची माहिती पालिका सूत्रांनी दिली.

दरम्यान या आयुर्वेदिक दवाखान्याचे लवकरात लवकर उद्घाटन केल्यास येथील स्थानिकांना त्याचा फायदा होईल. तसेच परिसरातील अनेक रुग्ण येथे उपचारासाठी येतील. त्यामुळे हा दवाखाना लवकरच सुरू करण्याची मागणी स्थानिकांनी केली आहे. तसेच वैद्यकीय उपकरणे उपलब्ध असूनही हा दवाखाना सुरू होत नसल्याने स्थानिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

**कोरोना रुग्णांसाठी विशेष कक्ष करता येईल**

मुंबईत दिवसेंदिवस कोरोनाच्या रुग्णांच्या संख्येत वाढ होत आहे. त्यामुळे बंद ठेवलेला हा दवाखाना आणि केंद्र लवकरच सुरू करावे, जेणेकरून परिसरातील गरीब आणि गरजू रहिवाशांच्या वैद्यकीय सुविधेबरोबरच कोरोना रुग्णांसाठी या दवाखान्यात विशेष कक्ष किंवा राखीव बेड ठेवता येतील, अशी मागणी शिवसेनेचे विलेपार्ले विधानसभा समन्वयक नितीन डिचोलकर यांनी मुंबई महानगरपालिकेच्या के-पूर्वचे सहाय्यक आयुक्त यांच्याकडे केली आहे.



# नुकसानग्रस्तांसाठी निधी मंजूर

**पालघर** : अवकाळी पावसामुळे पालघर जिल्ह्यातील घरे ,शेती फळशेती, मत्स्य उत्पादने, पशु इत्यादीचे नुकसान झाले आहे.त्यानंतर वनमंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री गणेश नाईक यांनी मंत्रिमंडळ बैठकीमध्ये नुकसान ग्रस्तासाठी निधीची आग्रही मागणी करून २ कोटी ७० लाखाचा निधी मंजूर करून घेतला आहे. पालघर जिल्ह्यात आलेल्या अवकाळी पावसासह वादळी वाऱ्यांमुळे एप्रिल आणि मे २०२५ महिन्यांत मोठ्या प्रमाणावर घरांची पडझड झाली. ४ ते ६ एप्रिल, ६ व ७ मे आणि २३ ते २५ मे २०२५ या कालावधीमध्ये जिल्ह्यात एकूण ३८ घरे पूर्णतः तर ३ हजार ८५२ घरे अंशतः बाधित झाली आहेत. याशिवाय १० झोपड्या पूर्णतः नष्ट झाल्या असून ६ गोठ्यांचेही नुकसान झाले आहे. या आपत्तीग्रस्तांसाठी शासनाच्या महसूल आणि वन विभागाकडून रु. २ कोटी ५० लाख ६३ हजार ९२५ इतक्या निधीची मागणी करण्यात आली होती. यासंदर्भात २ जून २०२५ रोजी पालघर जिल्हाधिकारी कार्यालयात पालकमंत्री गणेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक झाली.

## मेरीटाईम बोर्डामार्फत ८८ कोटींच्या खर्चाचा प्रस्ताव सादर

# घारापुरी बंदरावर नवीन प्रवासी जेट्टी उभारणार

**उरण** : जगप्रसिद्ध एलिफंटा बेटावर आत्ता नवीन जेट्टी उभारण्यात येणार असून त्यासाठी मेरीटाईम बोर्डाने ८८ कोटी रुपये खर्चाचा प्रस्ताव सादर केला आहे. घारापुरीची लेणी पाहण्यासाठी देश, विदेशातून मोठ्या प्रमाणावर पर्यटक येतात. दिवसेंदिवस ही संख्या वाढत चालल्याने सध्या असलेल्या शेतबंदर जेट्टीवर कमालीचा ताण पडत आहे. हा ताण कमी व्हावा, यासाठी एलिफंटा बेटावर लवकरच नवी जेट्टी उभारण्यात येणार आहे.

सागरमाला योजनेतून उभारली जाणारी नवी जेट्टी सहा मीटर रुंदीची आहे. त्यासाठी अत्याधुनिक यंत्रणेचा वापर करण्यात येणार आहे. नव्या जेट्टीवर पर्यटकांसाठी निवारा शेड, स्वच्छतागृह, बैठकीची व्यवस्था यांसह अनेक सुविधा उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे पर्यटनाला अधिक चालना मिळेल, असा विश्वास महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने व्यक्त केला आहे. काळ्या पाषाणामध्ये कोरलेल्या लेण्यांमुळे एलिफंटाचा समावेश वर्ल्ड हेरिटेजमध्ये करण्यात आला आहे. शिवाची विविध रूपे साकारली असून लेण्या पाहण्यासाठी दरवर्षी जगभरातून २० लाखापेक्षा अधिक पर्यटक येत असतात. गेट वे ऑफ इंडिया येथून बोटीने पर्यटक शेतबंदर जेट्टीपर्यंत येतात.

सध्या ही जेट्टी फक्त चार मीटर रुंदीची असल्याने बोटीमध्ये चढ-उतार करण्यासाठी अनेक अडचणींचा सामना पर्यटकांना करावा लागतो. विशेषतः ज्येष्ठ नागरिक व महिलांना अधिक त्रास होतो. ही बाब लक्षात घेऊन महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने नवी जेट्टी बांधण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.



**नव्या जेट्टीमुळे हा त्रास कमी होणार**

शेतबंदर जेट्टीपासून लेण्यांच्या पायऱ्यांपर्यंत सुमारे एक किलोमीटर अंतर चालत जावे लागते. नव्या प्रशस्त जेट्टीमुळे हा त्रास काहीसा कमी होईल, असे मेरीटाईम बोर्डाचे म्हणणे आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या चार मीटर रुंदीच्या मार्गावरूनच मिनी ट्रेन धावते. ही ट्रेन बच्चे कंपनीचे आकर्षण असून जेट्टी अरुंद असल्याने चालत जाणाऱ्या पर्यटकांना त्रास होतो. मात्र नव्या जेट्टीमुळे हा त्रास कमी होणार आहे.

"सहा मीटर रुंदीची नवी जेट्टी बांधत असतानाच चार मीटर रुंद असलेल्या जुन्या जेट्टीचेही मजबुतीकरण केले जाणार आहे. त्यामुळे पर्यटकांना ये-जा करणे सोयीचे होणार असून पर्यटकांच्या गरजा लक्षात घेऊनच हे काम करण्यात येईल. पर्यटकांची कोणतीही गैरसोय होऊ नये, याची काळजी नवी जेट्टी बांधताना घेतली जाणार आहे. पुरातत्त्व विभागाच्या मान्यतेनंतर लगेच प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे."

**- सुधीर देवरे, कार्यकारी अभियंता महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड**

# हुंड्यासाठी छळ केल्याचा आरोप... पतीला हायकोर्टाचा दिलासा

**मुंबई** : हुंड्यासाठी पत्नीचा छळ केल्याचा आरोप असलेल्या पतीला उच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला. आरोपी पतीने नोकरीसाठी अमेरिकेत जाण्यास परवानगी मागितली होती. त्यावर सध्या पती-पत्नी सामोपचाराने प्रकरण मिटवण्यास तयार असल्याचे लक्षात घेत न्या. अश्विनी ढोबे यांनी पतीचा अर्ज मंजूर केला.

याचिकाकर्त्या पतीला पंढरपूर सत्र न्यायालयाने परदेशात जाण्यास परवानगी नाकारली होती. त्या निर्णयाला आव्हान देत पतीने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यावर न्या. अश्विन भोबे यांच्या एकलपीठाने याचिकाकर्ता पती व प्रतिवादी पत्नीमध्ये झालेल्या समझोत्याच्या पार्श्वभूमीवर पंढरपूर सत्र न्यायालयाचा १४ मे २०२५ रोजीचा आदेश रद्द केला. दोन्ही पक्षकारांमध्ये मान्य झालेल्या अटी-शर्ती तसेच उच्च न्यायालयाने आखून दिलेल्या निर्देशांचे पालन करण्याचे निर्देश देत न्या. भोबे यांनी पतीला नोकरीच्या निमित्ताने अमेरिकेत जाण्यास परवानगी दिली. या प्रकरणात सांगोला पोलिस ठाण्यात दाखल झालेल्या गुन्ह्याप्रकरणी याचिकाकर्ता पती आणि प्रतिवादी यांच्यामध्ये फौजदारी कारवाई सुरू होती. विवाहितेच्या तक्रारीवरून पतीविरोधात भारतीय दंड संहितेच्या कलम ४९८-अ, ४०६, ४२०, ३२३, ५०४, ५०६ आणि कलम ३४ अंतर्गत गुन्ह्यांची नोंद आहे.




याव्यतिरिक्त वैवाहिक वादाशी संबंधित खटला प्रलंबित आहे. संबंधित गुन्ह्याचा तपास अद्याप पूर्ण झालेला नाही. तसेच आरोपपत्र दाखल करण्यात आलेले नाही, याची दखल घेत सत्र न्यायालयाने पतीची विनंती मान्य करण्यास स्पष्ट नकार दिला होता.

**न्यायालयाचे पतीला निर्देश**

न्यायालयाने याचिकाकर्त्या पतीला हमीपत्र सादर करण्याचे निर्देश दिले. जेव्हा पतीची प्रत्यक्ष उपस्थिती गरजेची असेल, तेव्हा तो न्यायालयात हजर राहील, याची लेखी हमी न्यायालयाने याचिकाकर्त्या पतीला द्यायला सांगितली. त्याचबरोबर त्याला पुराव्यासह त्याचा अमेरिकेतील निवासी पत्ता, संपर्क क्रमांक आणि ई-मेल पत्ता सादर करण्याचे देखील निर्देश न्यायालयाने दिले आहेत.

# मुंबई, केरळमधील पंधरा ठिकाणी ईडीचे छापे
## अभिनेता दिनो मोरियाच्या निवासस्थानाचीही झडती, मिठी नदी घोटाळा

**मुंबई** : मिठी नदीतील गाळ उपसण्याच्या कामातील ६५ कोटी रुपयांच्या घोटाळ्याप्रकरणी ईडीच्या अधिकाऱ्यांनी शुक्रवारी मुंबईसह केरळमधील कोची येथे पंधराहून अधिक ठिकाणी छापे घातले. यात अभिनेता दिनो मोरिया याचे वांद्रे येथील निवासस्थान तसेच घोटाळ्यात सहभागी असलेले महापालिका अधिकारी आणि कंत्राटदारांच्या ठिकाणांचा समावेश आहे. यावेळी मोठ्या प्रमाणावर आक्षेपार्ह कागदपत्रे हस्तगत करण्यात आली. या छापेसत्रामुळे महापालिका वतुर्ळात खळबळ उडाली आहे.




**१२०० कोटींचा गैरव्यवहार**

मिठी नदी गाळ काढण्याच्या कामात गेल्या वीस वर्षांमध्ये सुमारे १२०० कोटींचा गैरव्यवहार झाल्याचा आरोप आहे. फेब्रुवारी महिन्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशाने मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेच्या वीस अधिकाऱ्यांचे विशेष पथक या तपासकामासाठी स्थापन करण्यात आले होते.

मिठी नदीतील गाळ उपसण्याच्या कामात २००७ ते २०२१ या काळात कधीही न केलेल्या नदी सफाईकामाच्या बिलांमध्ये घोटाळा केल्याप्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेने महापालिका अधिकारी आणि कंत्राटदारांसाह १३ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या गुन्ह्यात आर्थिक गुन्हे विभागाने दिनो मोरिया याची दोन वेळा चौकशी केली होती. त्यानंतर ईडीनेही मनी लॉंड्रिंग प्रतिबंधक कायद्यांतर्गत याच घोटाळ्याची चौकशी सुरू करत शुक्रवारी छापे घातले.

अभिनेता दिनो मोरिया याच्या वांद्रे निवासस्थानी आठ तासांहून अधिक काळ कागदपत्रांचा शोध घेण्यात आला. तसेच त्याचा भाऊ सॅनटीनो याचीही चौकशी करण्यात आली. गेल्या महिन्यात अटक करण्यात आलेल्या महापालिका अधिकाऱ्याच्या आणि त्याच्या भावाचा मोरिया बंधूंशी नियमित संपर्क होता, अशी माहिती तपासात उघड झाली आहे. त्याचप्रमाणे महापालिका अधिकाऱ्याच्या कांदिवली येथील घरासह अनेक ठिकाणांचा छाप्यामध्ये समावेश आहे.

विशेष ड्रेजिंग उपकरणे भाड्याने देणाऱ्या निवडक पुरवठादारांना फायदा व्हावा यासाठी निविदांमध्ये फेरफार करण्यात आल्याचा तपास यंत्रणांचा संशय आहे. अलिकडेच आर्थिक गुन्हे विभागाने महापालिका अधिकारी आणि केरळमधील एका कंत्राटदार कंपनीचा भ्रष्टाचार उघडकीस आणला होता. या प्रकरणाच्या दाखल असलेल्या गुन्ह्यात महापालिका अधिकारी, कंत्राटदार आणि गाळ काढणाऱ्या यंत्रांच्या चालकांसह तेरा जणांची नवे आहेत.

# अश्लिल फोटो व्हायरल करणाऱ्या आरोपीला अटक

**भाईंदर** : झारखंड येथील फिर्यादी महिलेशी समाज माध्यमांव्दारे ओळख करुन तिला ब्लॅकमेल करण्याच्या उद्देशाने तिचे अश्लिल फोटो आणि मेसेज इंस्टाग्राम आणि फेसबुकवर व्हायरल करणाऱ्या आरोपीला गुन्हे शाखा कक्ष - १, काशिमिरा यांनी अटक केली आहे. पिडीत फिर्यादी महिलेसोबत फेसबुक आणि इंस्टाग्रामव्दारे आरोपी इमामुल हक हसनुल होदा याने स्वतःची खोटी माहिती देऊन मैत्री करुन पिडीत महिलेचे फोटो मिळवले होते. फिर्यादी यांची इच्छा नसतांना फिर्यादी यांच्याशी संपर्क करुन फिर्यादी यांना आरोपीने त्याच्याशी संपर्क ठेव नाहीतर फिर्यादी यांचे फोटो व्हायरल करण्याची धमकी देत होता. परंतु फिर्यादी यांनी आरोपीसोबत संपर्क बंद केल्यानंतर आरोपीने फिर्यादी यांचे फोटो फेसबुक व इंस्टाग्राम या समाज माध्यमांवर प्रसारीत करुन फिर्यादी यांची बदनामी केली. तसेच जिवे ठार मारण्याची धमकी दिली.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com